ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 12 | AUG - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# भंडारा जिल्हयातील सांस्कृतिक जिवन एक आढावा



डॉ. अरुण बा. हटवार
इतिहास विभाग प्रमुख सी. जे. पटेल कॉलेज, तिरोडा.

## प्रास्ताविक :

विदर्भ ही साहित्यिकांची जन्मभूमी आहे. असे संस्कृत पंडित राजशेखर यांनी तर विदर्भात जन्मलेल्या प्रत्येकच जन्मजात रसिक असल्याचे कवी निलकंठ दीक्षित यांनी म्हटले आहे. विदर्भाच्या पूर्व विभागात–झाडीपट्टीत अस्तित्वात असलेली रंगभूमी तर तिच्या नाट्यवेड्या रसिकामुळे चर्चेचाविषय राहिली आहे. लोकरंभूमीचे अभिन्न अंग असलेली दंडार आणि ऐतिहासिक संगीत रंगभूमीवरील नाटके यांना प्रेक्षकांची प्रचंड गर्दी उसळते. बदलत्या काळाप्रमाणे व्यावसायिकतेकडे वळू पाहाणारी झाडीपट्टी रंगभूमी एकेकाळी हौशी रंगभूमी होती. व्यावसायिक स्त्रीपुरुष कलावंताप्रमाणे आता काही नाट्यमंडळे चांगला व्यवसाय करीत आहेत. झाडीपट्टीच्या भंडारा या जुन्या अविभाजीत जिल्ह्याच्या विभाजनानंतर गोंदिया हा नवा जिल्हा अस्तित्वात आला. संपूर्ण झाडीपट्टीत दंडार व संगीत रंगभूमीची परंपरा या जिल्ह्याला लाभली आहे. दंडार नाट्याची पंरपरा असलेल्या भंडारा जिल्ह्यात आधुनिक संगीत नाटकाचा पाया घालतांना संगीतकार, पेंटर, दिग्दर्शक यांना आश्रयास ठेवले. त्यांनीच ग्रामीण अल्पशिक्षित लोकात अभिजा ला संक्रमित करून रंगभूमी उभी करण्यात मोलाचे योगदान दिले.

## लोकरंगभूमी

### बहुरूपी –

बहुरूपी हा महाराष्ट्रातील लोकप्रिय असा कलाप्रकार आहे. पोटासाठी विविध सोंगे काढून ती हुबेहुब पणे वाढविणारा, उच्च दर्जाची अभिनय कला आत्मसात असलेला कलावंत म्हणून बहुरूपी प्रसिद्ध आहेत.१ ते विविध पोशाख करतात व सोंगे घेतात. बहुरूप्यांचा उल्लेख ज्ञानेश्वरीत तसेच संत रामदास, तुकाराम यांच्या साहित्यात सापडतो. बहुरूपी हा भिक्षेकरी असतो. जोगी, तंट्या, भिल्ल इत्यादी सोंगे ते काढतात. बहुरूपी गाणी म्हणतात. ते विनोदी असतात. झाडीपट्टीत हाच बहुरूपी 'भिंगी' या नावाने ओळखला जातो. भिंगी व भिंगी सोंग (बहुरूपी) – तुम्ही आपल्या विचारात मग्न असता, तेव्हा अचानक कडक इस्त्री केलेल्या खाकी ड्रेसमधील पोलिस शिपाई तु च्यासमोर दत्त म्हणून उभा राहातो आणि आपल्या करड्या आवाजात तुम्हाला आदेश देतो, ''चलो, तु को पुलिसठेसन बुलाया है।'' त्याचे ते अधिकारवाणीने उच्चारलेले शब्द कानावर पडताच तुम्ही क्षणार्धात हबकून जाता.

काय करावे आणि काय नाही ते तुम्हाला सुचेनासे होते. तुची ही उडालेली तारांबळ बघण्यासारखी असते. कोणाला सहाय्यासाठी बोलवावे या विचारात तुम्ही असता. तोच ... दगड विरघळावा त्याप्रमाणे तो खाकी वेशधारी क्षणार्धात विरघळून जातो आणि तुच्या चरणाला स्पर्श करून तेवढ्याच अदबीने उद्गारतो ''दया करा मालिक, मी गरीब भिंगी आहे चार गावचा बोजरा देऊन जाऊ द्या मला.''२ केवळ 'बोजारा' म्हणजे बिदागी किंवा पोस्त यांच्यासाठी आपल्या कलेचा अद्वितीय आविष्कार घडविणाऱ्या या लोक कलावंताला झाडीबोलीत 'भिंगी' हे नामाभिधान आहे. तर त्याच्या सोंग घेण्याच्या या अप्रतिम कलेला 'भिंगीसोंग' असे म्हणतात.३ महाराष्ट्रातील अन्य भागातही आपल्या वेशभूषेद्वारे उदरनिर्वाह करणारी लोककलावंताची एक जात आहे. 'बहुरूपी' यानावाने तिला ओळखले जाते. हे भिंगी देखील स्वतःचा परिचय बहुरूपी म्हणूनच करून देत असतात.बहुरूपी व भिंगी या दोन शब्दामध्ये पुष्कळ नामसाम्यही आढळते. किंबहूना त्यांना 'बहुरूपी' असे संबोधने जास्त उचित होईल आणि या नावावरून 'भिंगी' या नावाची व्युत्पत्तीदेखील सांगने शक्य आहे. बहुरूपी भिंगी हा संबंध सहज मान्य होण्यासारखा आहे. वेगवेगळ्या वेशात आपली कला सादर करणारा हा लोकसमूह 'भिंगी' याच नावाने योग्य प्रकारे वर्णन करता येऊ शकते. भिंग म्हणजे चमकदार आरसा. 'भिंगा लावना' हा झाडी बोलीतील वाक्यप्रचार 'नटणे' या अर्थी प्रचलीत आहे. भिंगी जसा नटून सवरून पुढे येतो तशी कृती या वाक्यप्रचारामध्ये अभिप्रेत आहे.४ शिवाय शंकराचा विचित्र वेश धारण करणे ही भिंगी कलाकाराची खासीयत समजली जाते. गळ्यात साप, एका हातात त्रिशूल आणि दुसऱ्या हातात कमंडल घेतलेला आणि सर्वांगास राख फासलेला निलकंठ साक्षात उभा करण्याचे असामान्य कसब या भिंगी लोक कलाकारामध्ये असते. झाडीपट्टीचा प्यारा महादेव आपल्या दारासमोर प्रत्यक्ष उभा झाला म्हणून मालक ही सुखावतो आणि त्याला बिदागी देण्यासाठी भारल्यागत आपल्या खिशात हात टाकतो. राम, हनुमान इत्यादी पौराणिक सोंगामध्ये भिंगी अतिशय पारंगत असतात. एकाच व्यक्तीला सजवून त्यांनी केलेली अर्धनारी नटेश्वराची वेशभूषाही अनेकदा प्रशंसेस पात्र ठरली आहे. पूर्वी ते रात्रभर पोवाडा नामक दंडारितील प्रदीर्घ काव्यप्रकार सादर करून आपली बैठक रंगवायचे दंडारीतही त्यांचा सहभाग स्थानिक कलावंतासोबत असायचा. सर्वांगास सुऱ्या–खुपसलेला 'तंट्या' ही देखील भिंगी लोककलावंताचीच मिरासदारी होती. नंतर त्यांच्याकडून दंडारीने हे सोंग उचलले. भिन्न भिन्न सोंगे रात्रभर काढून प्रेक्षकांचे मनोरंजन करण्याचे व्रत त्यांनी प्रारंभीच्या काळापासूनच स्वेच्छेने स्वीकारले होते.५ आता चारगाव येथील कवडू सुतार भिंगी कलावंत आपली पोलिसांची किंवा पोष्टमनची वेशभूषा करून साकोली परिसरातील यजमानांची करमणूक करतो आणि कसे तरी पोट भरतो. बाळाची तांदूळकर हे आणखी एक वयोवृद्ध भिंगी कलावंत असल्याची माहिती मिळाली. ढोन माहुरे यांचा हनुंत अनेकांच्या मनातठसलेला आहे. त्यांचा मुलगा प्रभू माहूरे हा देखील आपल्या वडिलांच्या पावलांवर पाऊल टाकून भिंगी सोंग सादर करीत आहे. चारगाव, तिरखूरी, जरुघाटा येथे पूर्वी खूप भिंगी वस्ती करून होते. आता मात्र ते इतरत्र स्थलांतरीत होत आहेत.आपली कला सादर करण्यासाठी गावोगाव भटकणारा लोक कलावंत भिंगी आता इतिहास जमा होणार आहे.

## पांगुळ

पांगुळ पहाटेस 'धर्म जागो, धर्म जागो' असा घोष करीत फिरतो. सूर्याचा प्रतिनिधी मानला जातो. लोककल्याणासाठी तो शुभचिंतन करतो.६ वस्त्रे, पैसे दानात मागतो. वासुदेवाप्रमाणे पांगुळ येतो. पांगूळ झाडावर, भिंतीवर किंवा रस्त्यावर बसूनही दान मागतात. ते आध्यात्मिक, धार्मिक गाणी गातात. विविध देवळे व देवस्थाने यांचा उल्लेख करतात.

### भारुड –

भारुड हा कलाप्रकार लोकरंगभूमीवर ज्ञानेश्वरांच्या आधीपासून प्रचलीत आहे. याचा उल्लेख वाङ्मयात आहे. संत एकनाथांनी भारुडास विशेष महत्त्व प्राप्तकरून दिले. वेदांन्त तत्त्वज्ञानाचा प्रचार–प्रसार सामान्य जनतेध्ये करण्यासाठी भारुडे रचली गेली. नेहमीच्या व्यवहारातील रूपकांद्वारे यामध्ये वेदान्त सांगितले जाते. भारुड हे टाळ, मृदंगाच्या साथीवर गावयाचे गीत असते. मात्र यात वैद्रु,वासुदेव, जंगम, कुडमुड्या जोशी इत्यादी सोंगे दाखवितात. ही सोंगे घेणारी कलावंत मंडळी निरनिराळी भारुडे साभिनय गाऊन दाखवितात. पहेला (ता. पवनी, जि.भंडारा) येथील लक्ष्मण काशिराम खराबे (वय ७६),किसन गना मेश्राम (वय ५५), हरिभाऊ तुळशीराम बारसकर (वय ५६) भारुडाचे प्रयोग करीत आहेत.७

### गोंधळ

भारुडा प्रमाणेच मराठी लोकनाट्यामध्ये गोंधळाला महत्त्वाचे स्थान आहे.खेड्यापाड्यात विवाह प्रसंगी किंवा एखाद्या महत्त्वाच्या उत्सव प्रसंगी गाधेंळ घालण्याचीजूनी परंपरा महाराष्ट्रात सर्वत्र आहे. ही प्रथा फार जूनी आहे. ह्या प्रथेला इ. स.पूर्व १०४० वर्षाचा इतिहास आहे.८ झाडीपट्टीतही देवीसमोर गोंधळ घालण्याची प्रथा आहे. शंकराचे अकरा रुद्रगण मणिकर्णिका नदीच्या किनारी शंकराची तपश्चर्या करू लागले असता त्यांना शंकराने वर दिला व वस्त्रे–शस्त्रे सुद्धा दिली.रुद्रगण भक्त म्हणून पुढे प्रसिद्ध झाले. तेव्हा पासून 'गण' म्हणजे भक्त व त्यांचा समुदाय म्हणजे 'दल' म्हणून देवदेवतांची स्तुती करणाऱ्या गणांचे दल म्हणजे गणदल व त्यांनी घातलेला, रुढ केलेला पूजेचा प्रकार म्हणून गणदल–गोंदल किंवागोंधळ संबोधला जाऊ लागला असे म्हटले जाते.९ गोंधळ ही कला परंपरेने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत जाते. गोंधळ ही लोककला असून विशेष प्रसंगी सादर केली जाते.

### गोंधळाचे दोन प्रकार

१. साधा गोंधळ किंवा मराठ्यांचा गोंधळ – हा गोंधळ किर्तनाप्रमाणे भक्तीरसप्रधान असतो. कथानक सादर करणारे पूर्वरंग आणि उत्तररंगात सादर करतात. पूर्वरंगात कथानकाचे निरुपण तर उत्तररंगात आख्यान गायले जाते. संबळ, झांज,तुणतुण ही वाद्ये वाजविली जातात.२. या प्रकारात डौरी, भुते, आरादी, पोतराज यांचे गोंधळ येतात. त्यात डमरु,तुणतुणे, झांज आदी वाद्ये वाजविली जातात व भवानी–अंबा यांची स्तुती केलीजाते. झाडीपट्टीत झांज, संबळ, तुणतुणे इत्यादी वाद्यांचा उपयोग करतात. लग्न, मौंजी, बारसे, सण, तेरवी आदी निमित्ताने गोंधळासाठी यजमाना कडून बोलावणे येते तेव्हा त्या गावी गोंधळी मंडळ ९–१० च्या संख्येने जाते. देवापुढे किंवा पाटलाच्या वाड्यातील आवारात गोंधळ करतात.१०

गोंधळात प्रथम गण गातात. यात गणपतीची स्तुती असते. देवीची प्रार्थना–अंबा–रेणुका इत्यादी किंवा ज्या निमित्ताने गोंधळ घातला जातो त्या आश्रयदात्याच्या कुलदेवतेची स्तुती असलेले गाणे गातात. पायातील घुंगरांचा आवाज, अभिनय यांना संबळ, झांज व तुणतुणे यांची संगीत साथ असते. कथाकथनात वीररस अशा देवदेवतांच्या वा राजाच्या शौर्याचा समावेश असतो. प्रमुख गोंधळी हा चांगला बहुरूपी असतो. रसिकांतून बक्षीस, बिदागी मिळाल्यावर गोंधळी हाताच्या हालचालीवरून सांकेतिक भाषेत त्याचे नाव सांगतो व मंचावरील साथीदार त्यांच्या इशाऱ्याचा अर्थ लावून नाव उच्चारतो. या भाषेला 'करपावली'(करपल्लवी) असे म्हणतात.११ या भाषेविषयी लोकांध्ये कुतूहल असते. याकर पावली सांकेतिक भाषेत ३६ अक्षरांना विशिष्ट खुणांना दर्शविले जाते. ही लिपीपिढ्यान् पिढ्या संक्रमित होत राहिली. आज मात्र फार थोडे गोंधळी परिवार शिल्लक आहेत.बारव्हा ता. लाखांदूर, जि.

भंडारा येथे गणाजी गोंधळी यांची माहिती दयाराम बगमारे यांनी दिली आहे. दंडारी प्रमाणेच गोंधळाला सुद्धा उत्तेजन देण्याची गरज आहे.

## लोककला

### दंडार –

जीवन संघर्षाुळे उद्‌भवणाऱ्या परिश्रमाचा परिहार करण्याकरिता मानवाने लोककलांचा आविष्कार केला. आदीम समाजात अंगांगाचे हावभाव, विक्षेप आणिविभ्र यांच्या सोबत मुखध्वनीचे चित्कार, वाद्यांचे संगीत आणि वेशभुषेचे वैविध्य यांच्या संगमातून विविध लोककलांचा उदय झाला असे म्हणता येईल. पिढ्या न् पिढ्या जोपासलेल्या या कलाप्रकारामध्ये कला प्रवाहानुसार रंजनात्मक आणि गुणात्मकबदल घडून आले असले तरी त्यांचा मूलभूत गाभा मात्र कायम आहे असे दिसूनयेते. दंडार ही मनोरंजन करीत आलेली पुरातन लोककला आहे.१२ तसे पाहिले असता दंडार हे मराठवाडा, विदर्भ व उत्तर आंध्र या परिसरातील लोकनाट्य आहेअसे म्हणता येईल. पण 'झाडीपट्टीतील दंडार' मात्र या सर्वात भिन्न आहे. झाडीबोली 'दंड' या शब्दाचा 'शेत' असा अर्थ होतो.१३ म्हणजे दंडार या लोक नाट्याचा शेताशी संबंध असावा असे म्हणता येईल. खळ्यावर खूप पीक आलेले पाहून शेतकऱ्याने त्या आनंदात चारपाच डहाळ्या तोडल्या आणि तो आपल्या गड्यांसोबत नाचायला लागला. ही दंडारीची जन्मघटिका असावी.१४ दंडारितील नर्तक हातात जी कोरलेली काठी घेतात तिला 'टाहारा' असे म्हणतात. किंबहुना टाहारा हे दंडारीतील प्रमुख साधन आहे. हातभर लांबीची हीकाठी सुरेख कोरलेली असते. नाचताना एकाने दुसऱ्याच्या टाहाऱ्यावर आघात करायचा आणि त्या तालावर पदक्षेप करायचा ही दंडार नृत्याची शैली दंडारीतील टाहाऱ्याच्या उपयुक्तेवर प्रकाश टाकते.१५ टाहारा या शब्दाचे मूळ डहाळी या शब्दात शोधता येईल. डहाळी म्हणजे फांदी. याचाच अर्थ फांदीचा तुकडा म्हणजे टाहारा होय असे म्हणता येईल. कर्नाटकातील यक्षगान, कोकणातील दशावतारी आणि गुजराथ येथील गरबा या सभोवतालच्या लोककलांशी दंडारीचे नाते असल्याचे दिसनू येते. दंडारीचा आकृतिबधंय क्षगाणाची आठवण करून देतो. तिच्यातील पौराणिक कथा भागाचे प्रसंग दशावतारीशी संबंध सुचवितात. दंडार नृत्याचा वेग पाहून गुजराथी गरब्याची आठवण झाली नाही तरच नवल असा हा अन्योन्य संस्कृती संगम आहे.१६भंडार जिल्हा गॅझेटिअरने दंडारीचा उल्लेख करताना 'दिवाळीच्या वेळेसगोंड व इतर जाती दंडार करतात. हे एक दंडनृत्य असून प्रत्येक माणूस हातात दोनदंड घेऊन वेगवेगळा नाचत असतो' असे म्हटले आहे.१७ गॅझेटिअरने उल्लेखिलेल्या दंडारीत प्रत्येक व्यक्तीने दोन दंड धरावयाचे आणि स्वतःच ते एकमेकांवर आपटून वाजवायचे हे अभिप्रेत आहे. दिवाळीमध्ये आताही गोंड लोक असे नाचताना दिसतात. पण दंडारीचा हा एक प्रकार झाला. त्यावरून खऱ्या दंडारीची सुतराम कल्पना येऊ शकत नाही. किंबहुना भंडारा जिल्ह्यातील दंडारीत नर्तकाच्या हातात केवळ एकच टाहारा नामक दंड असतो. पायात घांगऱ्या आणि हातात टाहारा घेऊन केलेले हे नृत्य असते. तमाशाचा जसा फड, तशी दंडारीत मंडळी असते. परंतु दंडारीला तमाशासारखे व्यावसायिक स्वरूप आलेले नाही. तसेचदंडारीत केवळ पुरुषांचीच मक्तेदारी असते. आधुनिक तमाशाप्रमाणे दंडारित मात्रअजून स्त्रियांचा शिरकाव झालेला नाही.तुणतुणेवाला, ढोलकीवाला, झांजवाला आणि गायक असलेला शाहीर ही चौकडी दंडारीतील मागील फळी सांभाळते.१८ त्यांना 'झिलकरी' असे नाव आहे. छातीवर किंवा गळ्यावर डावा हात ठेवून आणि उजवा हात उंचावून शाहीर तालस्वरात 'रामा... हरी...' असा घोष करतो. ढोलकीवर ताल धरीत तुणतुणे आणि टाळ वाजायला लागताच क्षणभर प्रेक्षकांच्या हृदयाचा ठोका थांबावा असा हावाद्या वृंद वाजत असताना पायात घुंगरू बांधलेली आणि हातात टाहारा हलविणारी राजस

वेशातली नर्तक मुले एकेक पदक्षेप करीत प्रवेशतात. शाहिराच्या आवाजावर मुकाभिनय करीत मुले नाचाच्या विशिष्ट विविध मुद्रा घेत असतात. त्या मुद्रांना तुणतुणेवाला, ढोलकीवाला, झांजवाला, टाळवाला आणि शाहीर ही झिलकरी मंडळी देखील प्रतिसाद देत असतात. संख्येने पाच ते नऊ असलेल्या नर्तक मुलांना रंगीबेरंगी बागे घातलेले असतात. गळ्यात काचेच्या रंगीत माळा असतात. मधल्या नर्तकाला लुगडे नेसवून स्त्रीची वेशभूषा केली असते. विविध आवर्तने घेऊन आणि नृत्यमुद्रा दर्शवून स्वतःची विशिष्ट शिस्त असलेली हे नृत्य जलदगतीने आणि भिन्न हालचालीने प्रेक्षकांचे मन मोहून घेते.१९ रघुजी तिसरे (१८१८– १८५३) यांचा दरबारात सुद्धा दंडारीचे आयोजन केले जात होते.त्याच रात्री भोजनोत्तर पुन्हा दंडार दाखविण्यात येते. रात्रौ नऊ–दहावाजता सुरू झालेली ही दंडार भेट सुर्योदयापर्यंत सुरू असते. दिवाळीच्या दुसऱ्या दिवसापासून म्हणजे भाऊबिजेपासून झाडीपट्टीत गावोगावी ‘मंडई’ नामक जत्रा उत्सव असतो. तो कार्तिक पर्यंत चालतो. ही मंडई म्हणजे शेजारच्या गावातील अनेक दंडारीचा एक जलसाच असतो असे म्हणता यईल. दंडारीचे सर्व साधारणपणे तीन प्रकारात विभाजन करता येईल.

१. खडी दंडार
२. परसंगी दंडार
३. बैठक दंडार

यापैकी पहिला प्रकार अतिशय लोकप्रिय असून मंडई मध्ये प्रामुख्याने हीच दंडार दाखविण्यात येते. तसेच रात्रीच्या कार्यक्रमात देखील तिचेच प्राबल्य असते. क्षणात संपणार तोच दोन पात्रे प्रवेशतात. विनोदी हावभाव आणि चेष्टा यांच्याद्वार प्रेक्षकांना हसवून त्यांचे पोट दुखविण्याचे अफाट सामर्थ्य या ‘खडी दंडार’ मध्येअसते. सासरी कामाने कावलेल्या सासुरवाशिणी भाऊबिजेनिमित्ताने मंडईत आलेल्या असतात. ही मंडई पाहून त्या सासुरवासाचे सारे क्लेश विसरतात आणि नव्या उभारीने पूर्ववत कामाचा गाडा उपसण्यास पूर्वीसारख्याच सज्ज होतात. मंडईत यांडारीच्या निमित्ताने दाखविण्यात येणाऱ्या ‘तंट्या’ हे देखील खास आकर्षण असते. हातापायांना धारदार तलवारी टोचलेल्या रक्तबंबाळ तंट्या पाहून मुलांचीतर भीतीने अक्षरश: बोबडीच वळते. खोडकर मुलांना आई मग वर्षभर याच तंट्याची भीती दाखवीत असते.दंडारीचा प्रारंभ अन्य लोकनाट्याप्रमाणे गण गाऊन होत असतो. मागील झिलकरी गात असतात. नर्तक मुले केवळ तेव्हा हात जोडून उभी असतात. गणसंपताच सुत्रधार व विदूषक यांचा प्रास्ताविकाचा प्रवेश होतो. त्यांच्या संवादातून सुत्रधाराद्वारे दंडारीचा उद्देश कथन केला जातो. त्याकरिता सूत्रधार श्री गणेशाला आवाहन करतो. तत्पुर्वी झाडूवाला व भिस्ती येऊन स्वच्छता करतात. नंतरनाचत गजानन प्रवेशतात आणि सुत्रधाराची विनंती ऐकून त्यास ‘कार्य सिद्धिसजावो’ असा आशीर्वाद देतात.२० अशा प्रकारे दंडारीचा ‘पूर्वरंग’ आटोपतो. दंडारीतील लावण्याचे लावण्य मनाला मोहित करणारे असते. मन विरघळून टाकणारा शृंगार तर येथे असतोच, त्याशिवाय वत्सल, करूण, शांत आणि वीर या रसांचा देखील तेवढ्याच तीव्रतेने परिपोष करण्याचे सामर्थ्य दंडारीतील लावणीत आढळून येते.भिन्न चाली व भिन्न ताल यांच्यामुळे या लावण्या कानाला गोड वाटतात, मनालाचिंब भिजवून टाकतात. ही लावण्यांची शिदोरी कामगारांना मग वर्षभर पूरते. यालावणीचे विविध प्रकार आहेत. नव्हे दंडारीने या लावणीच्या स्वरूपात मराठीला नवीन छंदोरचनाच बहाल केली आहे.

**मंडई –**

संपूर्ण हिंदूस्थानात दिवाळी अत्यानंदाने आणि उत्साहाने साजरी होत असतांना झाडीपट्टी त्यास अपवाद कशी राहणार? उलट झाडीपट्टीत हा आनंददुथडी भरून ओसांडताना दिसून येतो. मृगाच्या सरीसोबत प्रारंभ झालेल्या शेतकऱ्याच्या परिश्रमाला कार्तिक मासात शेतामधील सोनेरी पिकाच्या रूपाने पिवळे फळ प्राप्त झाले असते. मुठभर पेरलेले निसर्गाने ढिगांनी देण्याची किमया असते. म्हणून दिवाळी हा सण एक दिवसाचा नसतो, तर तो तब्बल चार दिवसांचा साजरा केल्या जातो.पहिला दिवस कडूपाण्याचा, दुसरा भसी (म्हैस) चढविण्याचा, तिसरा गाई खेळविण्याचा आणि चौथा भाऊबीजेचा अशी चार दिवसांची हजेरी संपत नाहीतोच झाडीपट्टीमध्ये मंडईचा हैदोस सुरु होतो. भाऊबीजेच्या दिवशी पहिली मंडई भरते.२१ गावोगावी ठरलेल्या दिवशी मंडई संपन्न होत असते. जाहीरात न देतापूर्वापार अनुभावावरून कोणत्या गावी, कोणत्या दिवशी मंडई आहे हे इत्थंभूत माहिती असते. नव्हे आपल्या नातेवाईकाच्या गावी असलेल्या मंडईला जायची पूर्वतयारी प्रत्येकजण आधीपासूनच करीत असतो. मंडई ही नातलगांना भेटण्याची अपूर्व पर्वणीच असते. भाऊबीजेचे निमित्तानेभावास ओवाळायला येणाऱ्या बहिणीचा तर मंडईला येण्याचा अग्रहक्कच असतो.नव्हे या मंडईच्या दिवशीच बहिण आपल्या भावाला ओवाळण्यास येत असते. झाडीपट्टीमध्ये भाऊबीज हा एकमेव दिवस बहीण–भावाच्या ओवाळणीचा नसतो.खरे सांगायचे तर त्या गावाची मंडई ज्या दिवशी असेल तो दिवस म्हणजे त्यागावाच्या बहिणीकरिता खरा भाऊबीजेचा दिवस समजला जातो. ही गावोगावची मंडई थेट कार्तिक पौणिर्मे पर्यंत चालत असल्यामुळे पर्यायाने झाडीपट्टीतील भाऊबीजया पौर्णिमेपर्यंत लांबत असते. दिवाळीच्या शेवटचा कालखंड म्हणून मंडईत जल्लोषाची अगदी परिसीमा असते. सारे उत्साहाने या मंडईच्या पूर्वतयारीत मग्न असतात. दुपार व्हायलालागली तशी दंडार मंडळीची चुळबुळ सुरू होते. मंडईचे आयोजन गावाबाहेरील मोठ्या आकारावर किंवा पटांगणावर होत असते. पाचसात विशालकाय आंबेपिंपळ–वड यांची झाडे असलेली ही जागा एरव्ही दुपारी जनावरांना विश्रांती घेण्यास्तव आरक्षित असते. तीच आज साफसूफ करून तिची पद्धतशीर आखणी केली जाते. प्रत्येक दंडार मंडळी आपल्या ने लेल्या जागेवर आपले मंडप उभारते आणि दंडार नाचायला सुरवात करते. चार बास उभे करून तीन बाजूला बलनावाचे त्याला पांघरूण झाकून रंगमंच बंदिस्त केल्या जातो आणि पुढे प्रेक्षकांचीहीगर्दी वाढयला लागते. शेजारच्या पंचक्रोशीतील पाच–सात दंडारीची तेथे एकत्रयात्रा भरते. आणि थोड्या वेळातच मंडई मो्ठ्या जलशाचे रूप धारण करते.एका बाजूला सातोसाती बाजार थाटल्या जातो. केळी, सिताफळे,भाजीपाला, मुलांसाठी खेळणी असे अनेक दुकाने लागली जातात. लहान मुलांची तर चंगळच असते. 'मंडई' हा शब्द मुंबईच्या माणसाला 'दररोजचा बाजार' याअर्थाने माहित आहे. कारण तिकडे या दैनंदिन बाजाराच्या जागेला मंडई असे नावआहे. हिंदी पट्ट्यातील मंडई या शब्दाचे हे रूप दिसते. अशा बाजारास झाडीपट्टीमध्ये 'गुजरी' असे संबोधले जाते.२२ झाडीपट्टीतील मंडई –झाडीपट्टीतील दिवाळीनंतरची 'मंडई' अगदी आगळी वेगळी अशी असते.यात थाटलेल्या पाचसात दंडारीच्या मंडपापासून तिला 'मंडई हे नाव पडले असावे असे म्हणता येईल. कारण हे दंडारीचे मंडप हेच या मंडईचे एकमेवाद्वितिय आकर्षण असते. प्रत्येक दंडार मंडळ आपल्या दंडार कौशल्याचे प्रदर्शन करीत असते. जवळच्या गावा गावामधील परस्पर सहकार्याचे आणि सौहार्दाचे दर्शनच या उपक्रमाद्वारे होत असते. किंबहूना असे म्हणता येईल की सहाय्यविना आणि परिपत्रकाविना या मंडईला लोकाश्रय मिळाला आहे. यात कोणी मंत्री नसतो की कोणी उद्घाटकनसतो. कार्यक्रमाची अथवा निमंत्रणाची पत्रिका तर नसते तरी बाया माणसांचा महापूर तेथे आपोआप लोटलेला असतो. आनंदाची अपूर्वाई उपभोगत तेथे सारे आपले क्लेश विसरून जात असतात.२३ सासरहून आलेली बहिण आपले सासरचे दुःख दंडारीच्या हास्यात पार विसरते. रोवण्यापासून तर निंदण्यापर्यंत आणि पेरणीपासून तर मळणी पर्यंत

कामाचागाडा हाकून कावलेला जीव दंडारीची खडी गं त पाहून जो हसायला लागतो. तो आपणास काही वेदना होत्या याची जाणीवच गमावून बसतो. आपण या वर्षीची मंडई पहायला जीवंत राहू किंवा नाही अशा संभ्र ात दिवस मोजणारे वृद्ध स्त्रीपुरुष मंडईत घडीभर उभे राहायला मिळाले म्हणून समाधानाने हसायला लागतात आणि पुढच्या वर्षी हे भाग्य न मिळाले तरी या विवंचनेने तो मंडईचा देखावा आपल्या नेत्रात आकंठ भरून घेण्याचा प्रयत्न करत असतात आणि ते दृश्य डोळ्यातून पापण्यावाटे बाहेर पडू नये म्हणून हर्षाने आपल्या पापण्या मिटून घेतात.आज नाटकाने दंडारीवर कुरघोडी केलेली आहे. त्यामुळे मंडईतील दंडारची फड कमी होते आहे. अशी खंत अनेक दंडारीचे जाणकार व्यक्त करतात. काहींनी आपला वसा पुढल्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे व्रत स्वीकारून नवीन मुलांना हातातटाहारा धरायला लावले आहे. अनेक ठिकाणी तरूण दंडार मंडळी समोर येतआहेत. दूरदर्शनाच्या झंझावतालाही न जुनता ही परंपरेची गुढी खांद्यावर धारण करून अनेक तरूण मंडळी आपल्या नवीन उत्साहाने वृद्धांचे बोट धरून मार्गक्रमण करायला सज्ज झाली आहेत.अशी ही मंडई पाहून मावळत्या सुर्याबरोबर लोकांना घरी जायची लगबग लागते. परत जाण्याची इच्छा नसता नाही जावेच लागते. कारण गावात दोन–तीनदंडारी आणि तेवढीच नाटके यांचे थिएटर्स आपापले भोंगे वाजवीत रात्री कार्यक्रमाला अवश्य येण्याची जाहीरात आपल्या कर्कश आवाजात करीत असतात. असा असतो झाडपट्टीतील मंडईचा मौसम, आनंदाचा, उल्हासाचा, लहान–थोरांना, बायकापोरांना,आबालवृद्धांना– साऱ्यांनाच. बैलांचा शंकरपट – एक आकर्षण –झाडीपट्टीत वसंत ऋतू केव्हा अवतरतो ते पहायला पंचांगाची आवश्यकता नसते. सावरी, गोंगल, मोह या महावृक्षांनी फुलायचा निर्णय घेतला की वसंताला यावेच लागते. आणि या वसंतागमनाची चाहुल लागताच आणखी दोन गोष्टी दिसायला लागतात. या फुलांच्या आणि परिसरातील रमणिय तलावांच्या लोभापायी देशोदेशीचे असंख्य पक्षी या झाडीपट्टीत पाहुणे म्हणून यायला सुरुवात होते. नयनरम्य निसर्गाचे निमंत्रण स्वीकारून हे पाहुणे भिन्न भिन्न देशातून येऊन भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यामधील या जलाशयांच्या पाण्यात डूंबतात. त्यांच्या सान्निध्यात असलेल्या फुलांच्या रंगागंधात रंगून जातात. या पाखरासारखेच शेतीमध्ये काम करणारे झाडीपट्टीतील बैलदेखील आता वाराप्यायल्या सारखे सैरावैरा धावायला लागतात. त्यांनाही या गंधाची झिंग आलेली असते की काय कुणास ठाऊक. पण झाडीपट्टीत संक्रांतीनंतर दररोज वेगवेगळ्या गावात संपन्न होणाऱ्या पटामध्ये पळणारे बैल पाहिले की त्यांना पाखरांचा 24पट, मंडई आणि दंडार ही झाडीपट्टीची सांस्कृतिक संचिते आहेत. यांना उपस्थित राहण्याचा योग टाळला तर या परिसरातील माणसाला चुकल्या सारखे वाटते. पटाची मजाच वेगळी आहे. पट हाकण्यात पटाईत असलेला कातकर छकड्यावर बसला आहे, बैल आपल्याच कैफात तोंडाला फेस आणून आवरेनास झालेले आहेत. दोन बलदंड माणसे दोन बाजूंनी आवळून त्यांना धरलेले आहे आणि तेवढ्यात पंचाने शिटी वाजवून सुटण्याचा इशारा दिला आहे.२५ पण शिटी वाजताचबैल सुटतील असे नाही. नेहमी सरावात सरळ निघणारे बैल ती अफाट गर्दी पाहून बुजाडतात, दचकतात आणि वर्षभर तयारी करणाऱ्या त्यांच्या मालकाचा आणिउत्साही कातकरांचा हिरमोड झाला नाही तर नवलच.पटात एका वेळी दोन जोड्या सोडण्यात येतात. आपण चित्रपटात कधीकधी बघतो की पटाच्या नावाखाली सारेच बैल एका वेळेस सोडले जातात. पण या जिल्ह्यातील पट त्यापेक्षा वेगळा आहे. येथे एका वेळी दोन जोड्या सोडण्यात येतात. सुरवातीला दोन्ही छान धावतात. आपली जोडी आता जिंकणार असे वाटत असताच बुजाडून फुटारतात आणि मग काय सर्व कष्ट पाण्यात.पटात दोन जोड्यांच्या छकड्यांना धावायला दोन दानी म्हणजे धावायचे आखीव मार्ग असतात. पण सुरळीतपणे धावणारी एखादी जोडी मध्ये बिचकत आणि आपली दान सोडून बाजूला जाते. यास जोडी फुटारणे असे पटशास्त्राच्या परिभाषेत म्हटले जाते. ही फुटारलेली जोडी आपल्या मालकाला खड्ड्यात टाकते. तशीच ती स्वत:ही खड्यात जाऊन फसते. टाची तयारी पटशौकीन

कितीतरी दिवस आधीपासून करीत असतात. छकड्याच्या चाकाची येट म्हणजे धाव आणि किल्लीचे खुंट अगदी पक्के बसविलेले असतात. पण पटावर छकडा आला की त्यांना काय होते कोण जाणे. पटातछकडा धावताना भोवरीचा येट निघाला नाही किंवा किल्ली निघाली नाही असेक्वचित घडते आणि मग त्या कातकराच्या म्हणजे गाडीवानाच्या फजितिलापारावार नसतो. अपघाताशिवाय प्रवास नाही असे पूर्वी म्हणायचे ते या पटाच्या बाबतीत खरे आहे असे म्हणावे लागते. कारण पटावरून आल्यानंतर कोणती जोडी छानपळाली यापेक्षा कोणती फुटारली आणि कोणत्या छकड्याची येट सुटली आणि कोणत्याची भोवरी निसटली याच्याच सुरस कथा घोळून घोळून एके विल्या जातात.२६ ''युद्धस्थ कथा रम्या' असे म्हटले जाते. आता युद्धाच्या कथा दररोज वर्तानपत्रातून आणि दूरदर्शनवर कळतात. ह्यामुळे त्यांच्यातील रमणियता केव्हाच संपुष्टात आलेली आहे. पण पट हे देखील एक युद्ध असते. आणि ते वर्षातून काहीकाळच पहायला नि ऐकायला मिळते. त्यामुळे पटाच्या कथा खरेच आजही रम्यवाटतात. पूर्वी 'बालभारती' या शालेय पुस्तकात 'पिंपळगावचा शंकरपट' यानावाचा पाठ होता. तेव्हा शंकर आणि पट यांच्यात काय संबंध आहे ते कळायलामार्ग नव्हता. कदाचित शंकराचे वाहन नंदी असल्यामुळे पटात धावणाऱ्या बैलांशीशंकराचा संबंध जोडल्या गेला असावा. 'पत्र' या संस्कृत शब्दावरून प्राकृत मध्येपात व पट्ट ही दोन रूपे होत असल्याचे राजवाडे म्हणतात. ही दोन्ही रूपेझाडी बोलीने स्वीकारली असल्याचे दिसून येते. पहिल्या रूपाने रोवण्यातील बायकांची 'पात' सजविली आणि दुसऱ्या रुपात हा बैलांचा 'पट' सजला आहे.२७

## छकडा पटाचे वाहन –

पट हाकण्याचा छकडा हे पटाचे वाहन महाराष्ट्रात अन्यत्र पहायला मिळणारनाही. केवळ दोन माणसांना बसता येऊ शकेल असे सुतारांच्या कलाकुसरीचीकमाल असणारे छोटेसे वाहन असते. पटाची जोडी जशी पाहण्यासारखी असते. तसाच हा छकडासुद्धा प्रेक्षणीय असतो. झाडीपट्टीच्या दंडारीत अशा पटाच्या लावण्या गायल्या जातात तशाच या छकड्यावर देखील येथील कलावंत शाहीरांनीलावण्या रचल्या आहेत.

उदा.एक छकडा नेला पहा नगरातून, दोनभोवऱ्या कातल्या वाढई संगीन।

छकडयाला बैल जुंपले रावण पोवण। बैलाला झुली टाकल्या मसुराच्या दोन।

महाराष्ट्रात शेतकऱ्याचे वाहन म्हणून केवळ खटारा किंवा बैलगाडी हे नाव प्रचलित आहे. तिकडच्या स्पर्धातही तेच हाकताना दिसतात पण झाडीपट्टीत मात्रत्या मालवाहू साधनाला 'बंडी' असे म्हणतात. तिच्यापेक्षा आकाराने थोडी लहान असलेली खाचर, छकडा हे या रांगेतील तिसरे आणि सर्वात लहान वाहन आहे. २८आजच्या यांत्रिक भाषेत बोलायचे तर बंडी म्हणजे ट्रक, खाचर म्हणजे कार अथवाजीप आणि छकडा म्हणजे मोटार सायकल. छकडा हा केवळ पटासाठी मुद्दामबनवून घेतलेला असतो. प्रत्येक पटाचा शौकीन स्वत:चा छकडा ठेवीत असतो. झाडीपट्टीत प्रत्येक पंचक्रोशीत दरवर्षी एकतरी पट असतो. पण पटाचे दिवस ठरलेले आहेत. कोणतीही जाहीरात न करता लोक पटावर आपोआप येत असतात. पटाच्या निमित्ताने नवीन नवीन गावी जाण्याचे एक निमित्त या मंडळींना आपोआप गवसते आणि पटाच्या गर्दीत आणखी वाढ होते.

## बक्षिसे –

पटात जिंकणाऱ्या बैलांच्या जोडीला प्रथम एक झेंडी मिळत असे. ती झेंडीमिरवित येणाऱ्या कातकराला आपण सारे जग जिंकल्याचा आनंद व्हायचा. अंतिम बक्षिसामध्ये सुरुवातीला झूली हे सर्वात मोठे बक्षिस असे. इतरांना घुंगरू, मटाच्यायेसणी इत्यादी प्रोत्साहनपर बक्षिसे दिली जायची. शाळेच्या स्पर्धांची साधने पाहूननंतर

शिल्ड आणि कप यांनी पटाच्या बक्षिसांमध्ये शिरकाव केला. आता तर पटातविजयी जोडयांना रेडिओ,कॅमेरा, टि.व्ही.संच अशी बक्षिसे दिली जातात. गावोगावीखास बैलांच्या पटानिमित्ताने रात्री नाटकाचा, दंडारीचा प्रयोग होणार असल्याचीजाहीरात केली जाते. नाट्यमंडळाचे कार्यकर्ते दिवसभर नाटक सादर करण्याची तयारी करतात. तर गावातील इतर गावकरी सकाळपासून पटाचे मैदान, सिग्नल्स यासाठी खपत असतात. नाटकासाठी जमलेल्या पाहुण्यांना दुपारनंतर पटाचे आकर्षण असते. दुरवरून आपल्या जोड्या घेऊन लोक नातेवाईकांकडे पटा–नाटकांसाठी येतात. पट आणि नाटक दोन्ही परंपरेचा भाग झालेले आहेत.२९

### वैशिष्ट्ये –

पौराणिक, ऐतिहासिक नाटके, स्वत:ची भडक व वैभवशाली सिनसिनेरी,सुगीनंतर बैलाच्या पटाच्या आयोजनासोबत तीन अंकी संगीत नाटके, स्त्रीभूमिकांसाठी'नट्या' व काही प्रसिद्ध नट आणणे व हौशीखातर जवळचा पैसा खर्च करण्याची तयारी लहानश्या खेड्यात या निमित्ताने येणाऱ्या अतिथींचे आदरतिथ्य करणे यागोष्टी जिल्ह्याच्या रंगभूमीचे ठळक वैशिष्टे असल्याचे स्पष्ट होते.३०

### झाडीपट्टीतील राधा –

आता मराठी वाङ्मयात दलित साहित्याचे दालन स्थिरस्थावर झाले आहे. त्यातही दलित रंगभूमी स्वत:चे वेगळे अस्तित्त्व दर्शवित आहे. तथापि 'दलितरंगभूमी' ही संज्ञा जन्मास यायच्या फार पूर्वीपासून या जिल्ह्याने (झाडीपट्टी) हीरंगभूमी जोपासली आहे, वाढविली आहे. झाडी मुलखातील ही पूरातन दलित रंगभूमी 'राधा' या नावाने ओळखली जाते. उपेक्षितांच्या गालांवरची ओघळती आसवे पुसून त्यांच्या ओठांवर निखळ हास्याचे कारंजे फुलविण्याचे आपले कार्य झाडीपट्टीतील राधा कोणताही गाजावाजा न करता आजही पार पाडीत आहे.३१

### राधा –

मुलींसारखा गोंडस चेहरा असलेला एक तरुण हेरतात. त्याला भडक रंगाचे चमकदार लुगडे नेसवतात. अंगावर चमकदार नकली दागीने घालतात. चेहऱ्यावर बटबटीत फेसपावडरचा लेप पोततात. आणि ही राधा नाचायला सज्ज होते. मागेटाळ, ढोलकी, तुणतुणे यांचे झिलकरी साथीला असतात. या साऱ्यांची मदारखड्या आवाजात गायन करणाऱ्या शाहिरावर असते. हा शाहिर राधेचा सर्वेसर्वा असतो. तो केवळ गायकच असतो असे नाही तर तो उत्तम शीघ्रकवी देखीलअसतो. अष्टपैलू नट तर असतोच असतो. डोक्यावर मडके घेऊन मथुरेच्या बाजाराला घाईघाईने जाणाऱ्या राधेला अडविणारा खट्याळ कृष्ण हाच शाहिर असतो. आपली फजिती झाली म्हणून स्वत:चे धोतर फेडणारा पेंद्यादेखील तोच असतो. वेशभूषेचा बडेजाव असा याराधेत नसतोच. त्याच्या डोळ्यावर रंगीत चष्मा असतो. पायात बूट असतात आणि हाताच्या मनगटाला घड्याळदेखील असते इतकेच नाही तर आज उशीर काझाला? अशी राधेला पृच्छा करतांना तो चक्क आपले घड्याळदेखील पुढे करतो.दोन वाक्ये होत नाहीत तोच शाहीर गाण्याची लकीर छेडतो. आणि तेव्हा वेगळ्याच धुंदीमध्ये राधेचे काम करणारा नाचायला लागतो. या लोकनाट्यातील कलावंत जसे निरक्षर असतात, तसेच प्रेक्षकही अडाणी असतात पण या कलावंतांचे आणि प्रेक्षकांचे असे जन्मोजन्मीचे नाते असते की आपल्या प्रेक्षकांची नाडी या कलावंतांना अचूक माहित असते. त्यांच्या भाषेत त्यांना सहज रूचेल व पचेल अशा संवादांनी हे मनोरंजन सुरू असते.३२इतर अनेक लोककला प्रकाराप्रमाणेच झाडीपट्टीच्या या राधेला लिखित संहिता नसते. आज रात्री काय सांगायचे ते पूर्वनियोजित नसते.

प्रेक्षकांच्या प्रतिसादानुसार राधेच्या सविधानकाचा विस्तार आकार घेऊ लागतो. मद्याच्याधुंदीत सारे विसरून जावे त्याप्रमाणे आपल्या धुंदीत दिवसभराचे परिश्रम विसरायला लावून प्रेक्षकांना वेगळ्या विश्वात ओढून नेण्याची अवघड कामगिरी ही राधा सहजगत्या पार पाडीत असते. आपल्याकडे प्रेक्षकांना खेचून आणण्याचे आणि आपल्या पुढील रसिकांना खिळवून ठेवण्याचे जबरदस्त सामर्थ्य या लोकरंजन प्रकारात आहे. पोटगावचे नानाजी राऊत राधा म्हणून नाचायचे. तेव्हा सासुरवाशिणी देखील त्यांच्यावर मोहित व्हावयाच्या. याचा परिणाम म्हणून नानाजींना लुगडघालण्यास बंदी घालण्यात आली. कोहमारा येथील बसुराज बन्सोड हे देखील याकोटीतील निष्णात राधा नर्तक होते. आज वासुराजची राधा आहे एवढे जरीमाहित झाले तरी पाहणाऱ्या लोकांची रांग लागायची. पुढे वसुराजाला सरकारने लुगड नेसण्यावर बंदी आणली. देवराव राऊत, विश्वनाथ सांबराकडे असे एकापेक्षाएक राधा नर्तक होते.३३ सुक्या नावाचा एक कलावंत राधा नाचायचा. त्याचे ते रूप इतके आकर्ष होते की तो लूगड नेसून रंगणी आला की हुबेहुब स्त्री वाटायचा. त्याच्या या देखण्या सौंदर्यावर अनेक बायका मोहित होत असत. आणि त्याची मनधरणी करत असत. या अनेक बायकांप्रमाणेच जनी गोंडिण ही एक होती. एका गोंडाच्या भरल्या घरातील ती सासुरवाशीण स्त्री मात्र खऱ्या अर्थाने त्या अनेक बायकांपेक्षा वेगळी निघाली. तिने स्वत:चे घरदार सोडले आणि मीरे सारखी ती त्या सुक्याच्या मागेलागली. आता जनी निर्धास्तपणे सुक्यासोबत राहायला लागली. इतकेच नव्हे तरती सुक्याच्या संचात सामील होऊन राधेचे काम करायला लागली. 'सुक्याचीराधा' या नावाने प्रख्यात असलेला संच 'जनीची राधा' या नवीन नावाने लोकांच्या तोंडात खेळायला लागली. झाडीपट्टीच्या रंगभूमीवर स्त्रियांनीच स्त्रियांची भूमिका करण्याचे पर्व फार उशिरा सुरू झाले असले तरी या रंगभूमीवर उभे राहण्याचे यशस्वी धाडस करणारी पहिली झाडी कलावंत म्हणून जनीचा सादर उल्लेख रंगभूमीच्या इतिहासकारांनी करणे आवश्यक आहे. ड्रामा/नौटंकी (खेळ) –ड्रामाचा (नौटंकी) प्रकार म्हणजे कथानकाचे काव्यात्मक नाट्य स्वरूप होय. झाडीपट्टीतील भंडारा–गोंदिया जिल्ह्यांच्या मध्य प्रदेशालगतच्या हिन्दी भाषेचा प्रभाव असलेल्या भागात नौटंकी या हिन्दी लोकनाट्याचा प्रभाव आहे. लोकरंगभूमीवरील तमाशा, नौटंकी (हिंन्दी) यासोबतच या भागात संगीत काव्यप्रधान लोकनाट्यप्रकार 'ड्रामा' (डरामा) नावाने प्रचलित असून तो सुद्धा फार लोकप्रियआहे. नाटकासाठी वापरल्या जाणाऱ्या इंग्रजी ड्रामा (ऊीरार) शब्दाचा जरी वापरकरण्यात आला असला तरी या कलाप्रकारात नाट्य थोडेच असते. अधिक भर काव्यसंगीतावर असतो.भडक वेशभूषा, खटकेबाज समरप्रसंगाला अनुसरून काव्य–संगीत, रंगीबेरंग प्रकाश योजना आणि पौराणिक – ऐतिहासिक कथानकामुळे दंडार किंवा नौटंक प्रकाराप्रमाणेच प्रेक्षकांना रात्रभर खिळवून ठेवण्यात 'ड्रामा' यशस्वी झाला आहे. लोकरंगभूमीला जवळची असलेली ही लोक नाट्यकृती आधुनिक नाटकांच्या नावावर झाडीपट्टीत सुरू झालेल्या अश्लील व भडक नाट्यप्रयोगाच्या पार्श्वभूीवर अधिक नैसर्गिक व आकर्षक वाटते.३४

**स्वरूप –**

'ड्रामा' (नौटंकी) मधील कलाकारांची वेशभूषा ही राजकथेतील राजाराणीसारखी भडक व आकर्षक असते. त्यांची सजावटही अत्यंत मनमोहक असते. या ड्रामासाठी २० बाय २० फुट एवढ्या जागेत मंडप उभारला जातो.त्याला दोन भागात विभागण्याकरिता मध्ये एक पडदा लावल्या जातो. या पडद्याच्या मागच्या भागात ड्रामाचे कलाकार आपले पात्र वाढविण्यासाठी तयार होऊन राहतात. तर समोरच्या भागात 'ड्रामा' (नौटंकी) सादर केला जातो. समोरच्या भागात ही एक पडादा एखाद्या बांबूच्या सहाय्याने गुंडाळून खाली वर करता येईल अशा पद्धतीने तयार केला जातो व त्याची दोरी (धागा) एका व्यक्तीकडे असते. ड्रामाचे दृश्य दाखववायचे असल्यास पडदा वर

उचलला जातो व दृश्य संपल्यानंतर पडदापाडल्या जातो. ड्रामा हा फक्त हिंदी भाषेतच दोहे, श्लोक, विरहगीत, लावणी इत्यादी प्रकारात तयार केलेला असतो.

ड्रामा खेळाचे विशषे म्हणजे यात स्त्रियाचें काम परुषच करतात. (लाके रगं भूमीवर स्त्रिया कामे करत नाहीत) आधुनिक नाटकात मात्र त्या कामे करतात. पात्रानुसारदेखगी सुडौल व्यक्ती स्त्रिच्या भूमिकेसाठी निवडतात. न्हावी आणि पेंटर यांच्यामदतीने मेकअपचे काम करतात. वेशभूषा व इतर साहित्य भाड्याने आणतात.काही मंडळाकडे स्वत:चे साहित्य असते. ड्राम्यात आधी काव्यरूपात संवाद करूननंतर त्याचेच संगीताच्या साथीने गायन करतात. त्यामुळे वेळ दुप्पट लागतो.'ड्रामा' रात्रभर चालतो. लोक रंगभूमीवरील सर्वच नाट्यप्रकार रात्रभर चालतात .अलिकडे सिनसिनेरी नाटकाच्या धर्तीवर बदलली जाते. प्रसंगाचे प्रवेशपाडतात, एका अंकात ७ ते ८ प्रवेश (प्रसंग) असतात. मधल्या वेळात रेकॉर्डींगडान्स दाखवून सिन बदलला जातो.३५ संगीताला व गायनाला महत्व असल्यामुळे अभिनयाला तेवढे महत्त्व नसते. ड्रामा सादर करणारे मंडळ गावच्या प्रमूखांचे यजमानपद स्वीकारते. प्रतिष्ठेसाठी सर्व खर्च करणाऱ्या व्यक्ती मिळतात. ड्रामाखेळ फुकटात दाखविला जातो. प्रेक्षकातून मंडळात काही बक्षिसी मिळते. यजमानहीपैसे देतात, अलिकडे नाटकाप्रमाणेच गटबाजीमुळे आणि राजकीय हस्तक्षेपामुळे गावात एकच दिवशी दोन दोन ड्रामा खेळवतात. त्यांना दुय्यम ड्रामा म्हणतात. समोरासमोर प्रयोग करून स्वत:चे श्रेष्ठत्त्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केला जातो. यात्रा–जलसे यामध्ये मात्र एकापेक्षा अधिक ड्रामा खेळ सादर होतात.
स्पर्धेुळेसादरी करणात सुधारणा होते, नेपथ्यात भर पडते.

## साहित्य –

ड्रामाचे साहित्य लिखित स्वरूपात उपलब्ध नसते. हस्तलिखिते दूरवरच्या गावाहून आणली जातात. काही प्रतिभावान कलावंत – कवी स्वत: रचना करतात. डोंगरगांव / पार्डी बांध (गोंदिया) (पूर्वी भंडारा) येथील परसराम राऊत या सातवावर्ग उत्तीर्ण कलाकाराने अशी अनेक कवने रचून ड्रामा सादर केल्याची माहिती श्री घनश्याम डोंगरे देतात. त्याने चंद्रावती का झूला, बोला का गव्हना, वीर अभिमन्यू,जयंद्रथ वध असे खेळ रचले.खोडशिवनी येथील ड्रामा मंडळ –नाटकासाठी प्रसिद्ध असलेले गोंदिया (पूर्वीचे भंडारा) जिल्ह्यातील खोडशिवनी हे गाव नाटकाप्रमाणेच दंडार, ड्रामा करीता देखील आघाडीवर आहे. दहा–बारा नाट्यमंडळे असलेल्या खेडेगावात सध्या दोन ड्रामा मंडळे अस्तित्त्वात आहेत.आधी दंडार सादर करणाऱ्या मंडळानी नव्याने ड्रामा हा कलाप्रकार आत्मसात केलाव पंचक्रोशीत त्याला चांगले नावही मिळाले. अंबादास मस्के आणि दुधराम पुस्तोडे हे अनुक्रमे दोन मंडळाचे प्रमुखआहेत. त्यानुसार दुधराम पुस्तोडे यांच्या श्रीराम प्रासादिक मंडळाने नौटंकी (हिन्दी)वरून प्रेरणा घेऊन स्वत: ड्रामा खेळ तयार केला. आधीच्या दंडार संचातूनरामदास परशुरामकर, सोा परशुरामकर, रामु कापगते, गोसावी कोळपते इत्यादी सहकारी कलावंत घेण्यात आले. त्यांची वेशभूषा नाटकाप्रमाणेच केली जाते. अंबादासच्या संचालक दिवाकर शिंदे–मेश्राम, जगन मस्के, रामु मस्के, विलासपरशुरामकर आहेत.सडक अर्जुनी, खोडशिवनी, घटेगांव, गिरोला, किन्ही, केसलवाडा, घाटबोरीयेथे ड्रामा मंडळ आहे. ड्रामा मंडळे मराठी भाषेत आपला खेळ सादर करतात.

## नाटक –

'नाटक म्हणजे प्रयोग आणि संवाद यांच्याद्वारा व्यक्त होणारा संघर्षकथात्मक अनुभव'.३६ आज नाट्यक्षेत्रातील पारंपारिक हळवेपणा, रडवेपणा, भावनिक संबंध, प्रेमभावना या कल्पनांचा लोप झालेला आढळतो. रंगभूमीने वेगळेच वळण तरघेतले नाही ना, अशी त्यामुळे शंका येते. पण झाडीपट्टी रंगभूमीने या साऱ्याकल्पनांचा सांभाळ करीत पारंपारिक नाट्याचे अस्तित्त्व अबाधित ठेवले आहे. झाडीपट्टी रंगभूमी आता प्रौढ झाली असून तिचा अनुभवही संपन्न झालाआहे. पुणे–मुंबई हे नाटकांचे माहेर घर. पण विदर्भातील मनेही या मराठी नाटकाचेवेडे आहेत. यामुळेच झाडीपट्टी रंगभूमीला येथे ठाण मांडता आले. विदर्भातीलचंद्रपूर, भंडारा, गडचिरोली, गोंदिया हे चार जिल्हे विशेषत्वाने मागास समजलेजातात. येथे सांस्कृतिक मागासलेपणही मोठे आहे. शहरी संस्कृतीचा गंध नसलेल्याया जिल्ह्यामध्ये करमणूकीलाही विशेष प्राधान्य नव्हते. दंडार, तमाशा, गोंधळ यालोककलाच येथील मनोरंजनाची साधने होती. यात दंडार हा झाडीपट्टीच्याजिव्हाळ्याचा विषय, दंडारीचे आयोजन म्हणजे रसिकांसाठी पर्वणीच असे. ज्या दिवशी दंडारीचे आयोजन केले जायचे त्या दिवशी नागरीकांच्या आनंदाला उधाण असे. कालांतराने रसिकांच्या अभिवृत्तीत बदल होत गेला व दंडारीमधून छोटेखानीनाटके सादर केली जावू लागली. त्यानंतर नाटकाचे अंक वाढले व प्रत्येक अंकानंतर दंडार सादर केली जावू लागली. अशाप्रकारे दंडारीतूनच नाटक उदयास आले. या नाटकामध्ये पूर्वी संगीताचा साज नसे. वाद्य उपकरणे उपलब्ध नसल्याने(किंवा महागडी असल्याने) केवळ डफ, तुणतुण्यावर या नाटकांचा संगीताची भिस्त असे. या नाटकात ऐतिहासिक, पौराणिक, धार्मिक व सामाजिक नाटकांचासमावेश अधिक होता. कारण, पूराणाची थोडीफार माहिती ग्रामीण श्रोत्यांना असल्याने या विषयावरील नाटके त्यांना सहज समजतील अशी एक समजूत होती.

अलीकडे नाटक म्हटले की गावासाठी आनंदोत्सव ही नाटके विशेषत: शंकरपटानिमित्त घेतली जायची. निव्वळ करमणूक हा त्यामागील उद्देश. रात्रभर नाटकआणि सकाळी शंकरपट, असा त्यावेळी प्रकार चालायचा. पण आता शंकरपटनसले तरी नाटके घेतली जातात. त्याला निमित्ताची गरज राहिली नाही. दंडार नाट्याची जुनी लोकपरंपरा लोकरंगभूमीवर विद्यमान असल्यामुळेच संगीत प्रधान आधुनिक नाटकांना मोठा रसिक वर्ग उपलब्ध झाला. झाडीपट्टीची संगीत प्रियता यावर अभ्यासक डॉ. हरिशचंद्र बोरकर यांनी विस्तारपूर्वक प्रकाश टाकलेला आहे. संगीत हा झाडीपट्टी रंगभूमीचा आत्मा आहे. पौराणिक, ऐतिहासिक,संगीतप्रधान नाटकांनी इतिहास निर्माण केला. गौरवशाली नाट्य परंपरेचा दंडारी सारख्या लोकनाट्यकलेचा वारसा होता. अशा या वैभवशाली झाडेपट्टीत लोकरंगभूमीवर आज सादर होणारी नाटके लोकांची अभिरूची सुधारण्याऐवजी ती बिघाडण्याचाच प्रयत्न करीत आहेत. मनोरंजनाबरोबरच नाटक हे लोक शिक्षणाचे व समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. याचा जणू विसरच पडलेला आहे. लोकाश्रयाचा असा गैरफायदा घेतल्या जात आहे. लोकच याबाबत उपाय शोधतीलव गतकाळातील वैभव प्राप्त करून ही रंगभूमी पुन्हा दिमाखाने उभी राहील असा आशावाद बाळगायला हरकत नाही.तमाशा (खडी गंमत) –पंचमी, बोहाडा, सोंगी भजन इत्यादी प्रायोगिक लोकरंगाविषयी लोकांचा सहभाग असतो व लोकाश्रयही असतो. या कलांच्या उत्कर्षामध्ये लोकांचे स्थानमहत्त्वाचे ठरते म्हणून लोकरंगभूमीच्या अभ्यासात या लोककलांचा अभ्यास महत्त्वाचाठरतो. ही लोकधर्मी नाट्यकला पारंपारिक नाट्याचे संदर्भ, विशेष लक्षात घेत पारंपारिक नाट्याचे सौंदर्य, तमाशा या लोकनाट्याच्या रूपाने लोकरंगभूमीवर आलेली आहे.३७ तमाशाची जडणघडण विविधनाट्यातूनच झालेली आहे. त्यात पारंपारिक नाट्याविषकाराचे अनेक विध पैलू दिसतात. विधी नाट्यातून विकसित झालेला तमाशा पुढे विधी नाट्यापासून वेगळा झाला व त्यात रंजकतेला स्थान मिळाले. गोंधळ परंपरेतून तमाशात नाट्य आले. (तमाशा गोंधळातून विकासपावला असे गणेश रंगनाथ दंडवते यांचे म्हणणे आहे) प्रथम तमाशात लावणी म्हणणारा मुख्य शाहीर सूर लावणारी व धृवपद गाणारी दोन माणसे व लावणीवर नृत्य करणारा

नाच्या पोऱ्या अशी प्रमुख मंडळी होती. सोंगाळ्या तमाशात नंतर आला.३८ तमाशाच्या जडणघडणीत शाहीराचा मोठा वाटा आहे. लावण्यातून तमाशाचे फंड रंगू लागले व लोकांना आनंद देऊ लागले. गोंधळ आणि जागरणातीलगानसरणी, रचनाप्रकार शाहीरांनी उचलला व लावणी सिद्ध केली. तमाशा अधिक लोकधर्मी बनला. तमाशा विधिनाट्यातून आल्याने त्यात पूर्वरंग उत्तर रंग असतात.गण–गौवळण, लावणी पूर्वरंगात तर वगनृत्य–नाट्य–संगीत–गीत–कथा उत्तररंगात सादर करतात. विधिनाट्याचा प्रेक्षक भाविक असतो तर तमाशाचा प्रेक्षक निखळमनोरंजनासाठी आलेला रसिक असतो. हा दोघातील फरक आहे. संताच्या कवितेपेक्षा शाहिरांची कविता पुढे गेली. त्यामुळे संतकवीपेक्षा शाहिरांची राधा वेगळी आहे. तिच्यामध्ये सामान्य माणसाची सखी दडली आहे.ती लोकपरंपरा, ऐहिकता, लौकिकता आणि जीवनश्रद्धेवर आधारलेली असते. भक्तीच्या दृष्टीने सगुण भक्तीचा ती सहज स्वीकार करते. पण निर्गुण, निराकार ब्रह्मजाणण्याची ताकद तिच्यात नसते.सामाजिक दृष्टिकोन –ढोलकीचा दमदार आवाज, घुगंरांचा छनछनाट, त्या तालावर भिरकणारीपावलं, शिट्ट्या फूंकून आणि फेटे–टोप्या उडवून लावण्यांना मिळणारी भरभरूनदाद.... तमाशा म्हटल की हेच दृश्य डोळ्यांसमोर येत. मराठी चित्रपटांनी तर असदृश्य असंख्य वेळा रंगवलय. शहरी पांढरपेशा समाजाला तमाशा माहित होतो. तो चित्रपटांच्या झगमगटातून, पण खरच तमाशा असा असतो? त्याचं विश्व एवढंमर्यादित असत? महाराष्ट्रातील कलेचे स्वरूप बदलतंय का? या प्रश्नांचा शोध घेण आवश्यक ठरते. महाराष्ट्रातील समाज जीवनात तमाशाला मोठं स्थान आहे. इतिहास आहे.परंपरा आहे. त्याचे वेगळे प्रकारही आहेत. ही लोककला बहुजन समाजाच्या पाठबळावर टिकून राहिली आहे. केबल, टिव्ही नसलेल्या, नकाशावर उल्लेखही नसलेल्या असंख्य गावात तमाशा हे मनोरंजनाच एकमेव साधन आहे. विदर्भातील सुमारे सत्तर–अंशी गावातील या कलेच स्वरूप, त्यातील कलाकारांच जगणं,समाजाची भूमिका, तमाशाला मिळणारी दाद, त्याचं अर्थकारण अस सगळं आपल्याल जाणवतं आणि मुख्य म्हणजे, कलावंताकडे उपेक्षेने पाहण्याची वृत्तीही. 'लोककलाजगल्या पाहिजेत' म्हणताना त्याच त्या जगवणाऱ्यांच वास्तव काय आहे हे लक्षातयेत आणि तमाशा टिकलाच तो खेडोपाड्यांतील लोकांच्या आश्रयावर हेही जाणवतं.मराठी चित्रपटातून तमाशाचं नटवं, बेगडी चित्रण आजपर्यंत आपण पाहात आलोआहे. त्यातून काही समज–गैरसमज मनात असतात.

## प्रकार –

तमाशाचेही वेगवेगळे प्रकार आहेत. नवसाचा तमाशा, तख्तावरचा तमाशा–विशेषतः मराठवाड्यात पहायला मिळतो. संतती (मुलगा) व्हावा म्हणून पीरालानवस बोलतात. नवस पूर्ण झाल्यानंतर सजवलेल्या बैलगाडीवर फळ्या टाकूनतख्त (मंच) तयार करतात. त्यावर तमाशा होतो. गाऊन तख्ताची मिरवणूक काढण्यात येते.दुसरा प्रकार म्हणजे लहान गावातमध्ये जत्रेत होणारा झाडाखालचा तमाशा.या तमाशाला तिकीट नसतं. गावकऱ्यांकडून सुपारी/मानधन घेऊन हा तमाशासादर केला जातो.झाडीपट्टीतील तमाशा –मोगलाईच्या कालखंडापासून तमाशाचा उगम झाला असे मानण्यात येते.घरादारा पासून फार काळ दूर राहिल्याने मनोरंजनासाठी गोंधळाचे कार्यक्रम केलेजात. परंतु याने शृंगार रसाची निर्मिती न झाल्याने 'तम–नाशा' किंवा तमाशा हानवा लोककलाप्रकार अस्तित्वात आला. कालांतराने हाच कलाप्रकार सर्वत्र लोकप्रिय झाला.स्वातंत्र्यपूर्वकाळात तमाशा या लोककला प्रकाराला संगीत बारी, तमाशाफड असे स्वरूप प्राप्त झाले व राष्ट्रीय जनजागरण व राष्ट्रभक्ती जागविणारा कलाप्रकार म्हणून मान्यता मिळाली आणि राष्ट्रीय खडा तमाशा असे नाव त्याने धारण केले. तमाशाला झाडीपट्टीत 'गंमत' असेही संबोधतात. बैलाचा पट (शर्यत) उत्सव,मंडई, जलसे या प्रसंगी तमाशे सादर केले जातात. गण, गवळण, लावणी, झगडा,पोवाडा ही तमाशाची प्रमुख अंगे होतं. तमाशामध्ये स्थूलमानाने (१८ व्या शतकाचाउत्तरार्ध) प्रथम

ढोलकी, तुणतुणेवाले मंचाव प्रवेश करून गणपती, सरस्वती यांचस्तवन करीत. याला 'गण' म्हणत. त्यानंतर गवळण सादर केली जाई. कृष्णालाद्द्देशून गवळणी जी गाणी म्हणत त्यांना 'गवळणी' म्हणतात.३९

संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम इत्यादी संतांनी आपल्या साहित्यात अनेक गौळणी रचल्या आहेत. गवळण या कार्यक्रमात कृष्ण आणि त्याच साथिदार राधेला व तिच्या सख्यांना (गौळणींना) छेडीत तेव्हा त्यांचा संवाद सादरहोत असे व यामध्ये अभिनयाला व विनोदाला वाव असे. नंतरच्या भागामध्ये लावण्या म्हटल्या जातात. शाहीर किंवा पुढारी (गोंधळात नाईक) सरदार, सोंगाड्या,नाच्या पोऱ्या यांचे नृत्य व अभिनय असे. तत्कालीन परिस्थितीवर सोंगाड्यालोकांना हसवीत असतो. त्यानंतरच्या भागात लावणी व झगडा सादर करतात. नवरा–बायको किंवा स्त्री–पुरुषातील झगडा खटकेबाज संवाद, रंगबाजी करून मनोरंजन केले जाते. तमाशात दोन पक्ष असतात.

१. कलगीवाले – हे शक्तीचे उपासक असतात.

२. तुरेवाले – हे शिवाचे उपासक असतात.

(अलिकडे सुभान हा तिसरा पक्ष अस्तित्वात आलेला दिसतो)कलगी, तुरा व सुभान या तीन पक्षामध्ये आध्यात्मिक सवाल–जबाबाचीस्पर्धा चालते. ती मनोरंजक आणि चुरशीची असते. शेवटी मुजऱ्याचे गाण`म्हणतात व तमाशा संपतो. स्वातंत्र्योत्तरकाळात तमाशा हे सामान्य लोकांना मनोरंजनाचे साधन म्हणून जवळचे वाटत होते. परंपरागत दंडार नाट्य आधुनिक मराठी रंगभूमीच्या आगमनामुळ मागे पडत चालले होते. मात्र प्रसार माध्यमातून या कलावंत शाहीरांना कधीसिद्धी मिळाली नाही. त्यांच्या वृद्धापकाळी अलिकडे तमाशालाही फारसे स्थानराहिले नसल्याने झाडीपट्टीत शाहीर संस्था अडचणीत आली आहे.महाराष्ट्र शाहीर परिषदेच्या माध्यमातून सर्व शाहीरांना एकत्र आणण्याचकाम लोककलावंत नामदेवराव सिंहगडे, लाखांदूर, जि. भंडारा हे करीत आहेत. तेस्वतः आकाशवाणी आणि दूरदर्शन कलाकार आहे. शेतीची कामे संपल्यानंतर चैत्र महिन्यात गावोगावी जत्रां ध्ये फिरून हातमाशा केला जातो. महत्त्वाचे म्हणजे तमाशा हा आपल्या ग्रामीण समूह जीवनाचा एक भाग आहे हे सतत जाणवते. उघड्या माळ्यावर हजारो प्रेक्षकांना खिळवूनेवणाऱ्या लोककलावंतांची ताकद कळते. रात्र रात्र ७–८ तास प्रेक्षकांना खिळवूनेवणे सोपे काम नाही. तमाशा कलावंताचा दिवसारात्रीचा वावर, बिऱ्हाड पाठीवर घेऊन फिरणाऱ्या या कलावंताचे उघड्यावर जगणे दिसते. भर दुपारी १२ वाजतामश्री लावून दिवसाची सुरुवात करणारे कलाकार, ट्रकच्या पडद्याच्या आडोशालासर्व व्यवहार पार पाडणारी माणस, स्टेज गाजविणारी कलाकार मंडळीलकीवाल्यांची रक्ताळलेली बोटे नृत्यांगनांच्या अंगावरून फिरणाऱ्या नजरा इथ आपल्याला दचकवितात. दुर्ग भागात तमाशाला खळाळून दाद देणारा शेतकरीवर्ग, तमाशाची मौज लुटणारा स्त्री प्रेक्षक आणि सोंगड्याकडे अप्रूपाने बघणारी मुलेकला प्रकाराविषयी त्यातील माणसांविषयी त्यांच्या संघर्षाची जाण देतात.

## सारांश

भंडारा जिल्ह्याचे सांस्कृतिक व वाङ्मयीन महात्म्य फार मोठे आहे. अनेकपिढ्यांचा इतिहास त्यात लपलेला आहे. दंतकथा, आख्यायिका, लोककला, लोककथा आहेत. प्राचीन काळातील लोककलेचे जतन करून रंगभूमीवरून परंपरेने ती प्रत्यक्षसादर केली जाते. यातूनच मनोरंजन व समाज प्रबोधनाचे महत्त्वाचे कार्य पार पाडले जाते. पावसाळा संपतो न संपतो तोच दसरा, दिवाळीत धान कापणे व मळणीचा हंगाम येतो. शेतीतून उत्पादीत

झालेले सोने पाहून दसरा, दिवाळीचे सण मोठ्याथाटात साजरे केले जातात. एकंदरीत शेतकऱ्याच्या आनंदाला उधाण आलेले असते. भंडारा जिल्हा झाडीपट्टीचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. शेतात कामकरणारा बैल मोकळा होऊन आनंदाच्या भरात जमिनीवर धावायला लागतो. यातूनच शंकरपटाचा जन्म होतो. दिवसा बैलांचा शंकरपट, जत्रा, मंडई तर रात्रीलादंडार, नाटके, गोंधळ, तमाशा, ड्रामा असे मनोरंजनाचे कार्यक्रम सादर केले जातात. रंगभूमीवरील पडद्यावरील दृश्य, वेषभूषा, वाद्ये, वादक, संगीतकार, पुरुषस्त्रीपात्रे करणारे कलाकार, पेंटर, दिग्दर्शक त्या गावातील किंवा परिसरातीलच असतात. वाङ्मयीन लिखाण, गाणी, पोवाडे, लावण्या, कथा, विविध प्रकारची सादर करावयाची गीते, ग्रामीण भागातील शाहीरांनी किंवा लोकांनी लिहिलेली असतात. येथील कलाकारांनी आपल्या प्रतिमा व प्रतिभेचा उच्चांक गाठून हे कार्य अव्याहतपणे लोकरंगभूमीवर सादर करून त्यातून मनोरंजन, समाज प्रबोधन वराजकीय एकात्मता जोपासली आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची

१. लांजे हिरामण : लोकनृत्यनाट्यधारा, पृ. ७५
२. बोरकर ह. : लोकरंगभूमी, पृ. १३१
३. बोरकर ह. : झाडीपट्टी दंडार, पृ. ८५
४. बोरकर ह. : लोकरंगभूमी, पृ. १३२
५. लांजे हिरामण : लोकनृत्यनाट्यधारा, पृ. ७५
६. खराबे लक्ष्मण : पहेला (मुलाखत)
७. लांजे हिरामण : लोकनाट्यधारा,पृ. ७६
८. लांजे हिरामण : लोकनाट्यधारा,पृ. ७९
९. लांजे हिरामण : लोकनाट्यधारा,पृ. ८०
१०. काळे, या.मा. : नागपूर भोसले, पृ. ४४१
११. रजतगंधा स्मरणिका, पृ. ५६
१२. बोरकर द.सा. : झाडीपट्टी, लोकरंगभूमी, पृ. १४३
१३. बोरकर द.सा. : झाडीबोली ऐश्वर्य, पृ. ५७
१४. बोरकर हरिश्चंद्र : लोकरंगभूमी, पृ. १४४
१५. Bhandara District Gazetteer, p. 64
१६. बोरकर हरिश्चंद्र : झाडीपट्टी दंडार, पृ. ८८
१७ बोरकर हरिश्चंद्र : लोकरंगभूमी, पृ.१४५
१८. बोरकर हरिश्चंद्र : झाडीपट्टी दंडार, पृ. ८८